20-04-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/19/2025 9:18 PM Page 1

निवडक

धारगळ येथील साईबाबा स्वामी समर्थ मंदिर मूर्ती प्रतिष्ठापनेचा आज वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. १९ : पाडलोसकरवाडा, दाडाचीवाडी धारगळ येथील श्री साईबाबा स्वामी समर्थ मंदिर मूर्ति प्रतिष्ठापनेचा वर्धापनदिन रविवार दि. २० रोजी विविध कार्यक्रमांनिशी साजरा होणार आहे. वर्धापनदिनानिमित्त सकाळी लघुरुद्र, अभिषेक, दुपारी आरती नंतर महाप्रसाद होणार आहे. उत्सवाचे यजनान सौ. तेजा तुकाराम तुळसकर यांच्यामार्फत पूजा होईल. संध्याकाळी ५ वाजता श्रींची पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. संध्याकाळी ७ वाजता तळेवाडा – रेवोडा येथील महिला भजनी मंडळाचा कार्यक्रम होणार आहे. यात सरोजनी सुतार, रुपाली तळणकर, पुनम चोडणकर, शिल्पा तुयेकर, कल्पना फडते, मंगल सुतार, सौ. मोहिनी रेडकर, मेघना नाईक, राधिका गिरप, सिताबाई मयेकर, नीता मांद्रेकर या गायक कलाकारांचा सहभाग असून संवादिनी साथ प्रभाकर सुतार आणि तबला साथ योगेश राणे यांची असेल. सर्वांनी उपस्थित राहून श्रीकृपेचा लाभ घ्यावा, असे आवाहन साईबाबा ट्रस्टतर्फे प्रसाद पाडलोसकर आणि बंधूंनी केले आहे.

राज्यपालांकडून गोव्यातील लोकांना ईस्टरच्या शुभेच्छा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १९ : गोव्याचे राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांनी गोव्यातील लोकांना विशेषत: ख्रिश्चन बांधवांना ईस्टरच्या हार्दिक शुभेच्या व्यक्त केल्या आहेत.आपल्या संदेशात राज्यपाल म्हणतात, ईस्टरच्या शुभप्रसंगी मी गोव्यातील लोकांना हार्दिक शुभेच्छा व्यक्त करतो. ईस्टर येशू ख्रिश्तांच्या गौरवशाली पुनरुत्थानाचा दिवस म्हणून ईस्टर साजरा केला जातो.

खरं तर येशू ख्रिश्तांचे पुनरुत्थान हे ईश्वरी असते आणि ख्रिश्ती जीवन आणि श्रद्धेची आशा आणि पाया आहे. ईस्टर हे सर्व वाईट शक्तींवर मिळविलेल्या विजयाचे प्रतिक आहे. येशू ख्रिस्तानी आपल्याला देवावर आणि मानव जातीवर प्रेम करण्याची शिकवण दिली. हा सण आपल्याला बंधुता, प्रेम, करूणा आणि क्षमा यांचा मौल्यवान संदेश देतो. जीवन जगण्यासाठी हे जग एक चांगले ठिकाण बनविण्यासाठी आपण प्रभु येशू ख्रिस्ताच्या आदर्शांचे आचरण करूया. या वर्षाचा ईस्टर सण गोव्यातील लोकांना शांतता, आनंद, चांगले आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवो, असे राज्यपाल आपल्या संदेशात शेवटी म्हणतात.

मुख्यमंत्र्यांकडून गोव्यातील लोकांना ईस्टरच्या शुभेच्छा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १९ : मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी गोव्यातील लोकांना विशेषता: ख्रिश्चन बांधवाना ईस्टरच्या शुभ प्रसंगी हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. आपल्या संदेशात मुख्यमंत्री म्हणतात, ईस्टर हा येशू ख्रिश्तांचा पुनरुत्थानाचा दिवस. येशू ख्रिश्तांना क्रॉसवर मारल्यानंतर तीन दिवसांनी येशू ख्रिश्तांचे पुनरुत्थान झाले. हा दिवस म्हणजे जीवनाने मृत्यूवर मिळविलेला विजयाचे प्रतिक आहे. ईस्टर हा दैवी प्रतीक आहे. ईस्टर हा आनंदाचा दिवस आहे. येशू ख्रिश्तांची उदात्त मूल्ये अधिक अर्थपूर्ण जीवन जगण्याची शक्ती देतात. येशू ख्रिश्तानी प्रेम, करुणा, आशा, विश्वास, जबाबदारी आणि क्षमा या शाश्वत मूल्यांचा उपदेश केला. त्यांच्या शिकवणी प्रत्येकाला परिवर्तन करण्यास आणि शांत आणि आनंदी जीवन जगण्यास मदत करतात. ईस्टर सणानिमित्ताने समाजात बंधुता आणि मानवतेची भावना वाढीस लागते असे मुख्यमंत्री म्हणतात. ईस्टरचा सण सर्वांना पापावर विजय मिळविण्याची प्रेरणा देवो आणि सर्वांच्या जीवनात अधिक शांतता, समृद्धी, आनंद घेऊन येवो असे मुख्यमंत्री आपल्या संदेशात शेवटी म्हणतात.

अल्पवयीन मुलीला मारहाण; संशयितास भेडशीतून अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १९ : खाजणे–पेडणे येथील अल्पवयीन दलित मुलीला मारहाण केलेल्या संशयित समीर कोरगावकरला पोलिसांनी भेडशी – सिंधुदुर्ग येथून अटक केली. या प्रकरणी तक्रार नोंद झाल्यापासून संशयित फरार होता.

मिळालेल्या माहितीनुसार १४ रोजी सायंकाळी संशयित आरोपी समीर कोरगावकर हा खाजने येथून आपल्या दुचाकीवरून जात असताना समोरून येणाऱ्या पीडित मुलीची दुचाकी त्याच्या बाजूने आली. त्यामुळे दोघांत शाब्दीक चकमक उडाली. नंतर संशयित आरोपी मुलीच्या अंगावर धावून गेला व तिचे टी–शर्ट पकडून जातीवाचक उल्लेख केला, अशी तक्रार करण्यात आली. मुलीच्या पालकांनी पोलिस स्थानकात रीतसर तरकार नोंदवली.

दरम्यान या योग्यवेळी कारवाई करण्यात आली नाही, हे कारण देऊन पेडणे पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण देसाई यांना रिझर्व्ह लाईनमध्ये हजेरी लावण्याचे निर्देश देण्यात आले.

तर उपअधीक्षक ब्राझ मिनेझिस यांना दोन दिवसांत चौकशी अहवाल देण्याच्याही सूचना करण्यात आल्या. दरम्यान उपअधीक्षकांनी तपासचक्रे गतिमान करत भेडशी – सिंधुदुर्ग येथून कोरगावकर यांचा मागोवा काढला. नंतर त्याला ताब्यात घेऊन रितसर अटक करण्यात आली.

वार्का येथील झुरी रिसॉर्टबाहेर परदेशी पर्यटकांचा छळ

खाजगी टॅक्सी बुक केल्याने स्थानिक चालकांचा विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १९ : झुरी व्हाईट सँड्स रिसॉर्ट, वार्का येथून गुजरातमार्गे युकेला परत जाणाऱ्या ब्रिटनस्थित कुटुंबाला स्थानिक टॅक्सी चालकांकडून छळाला सामोरे जावे लागले. खाजगी टॅक्सी बुक केल्यामुळे त्यांना अडवण्यात आले आणि चालकांना धमकावण्यात आले, असा गंभीर आरोप संबंधित पर्यटकांनी केला आहे. या प्रकरणाचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर गोव्यातील टॅक्सी व्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

पर्यटकांच्या माहितीनुसार, १७ एप्रिल रोजी ही घटना घडली. विवाहासाठी आलेल्या कुटुंबाने चार ते पाच खाजगी टॅक्सी आधीच ऑनलाइन बुक केल्या होत्या. मात्र, रिसॉर्टबाहेर स्थानिक चालकांनी त्या गाड्या अडवल्या आणि त्यातून प्रवास करणाऱ्या पर्यटकांना जाऊ देण्यासाठी ५,००० रुपये मागितले.

ते आमच्या टॅक्सी अडवत होते. खिडक्या ठोठावत होते, चालकांशी वाद घालत होते. ते आमच्या कुटुंबाला इजा पोहोचवू शकतात अशी धमकी देत होते, असे एका पर्यटकाने सांगितले. जगात इतर कुठेही आपल्याला हवी ती टॅक्सी बुक करता येते. पण इथे स्थानिक चालक आपली मक्तेदारी चालवत असल्याचे जाणवते.

व्हायरल व्हिडिओमध्ये वधूच्या आईने या प्रसंगाला भयानक आणि लज्जास्पद अनुभव असे संबोधले आहे. आम्ही हॉटेलबाहेर अडकलो होतो. स्थानिक चालकांनी आमचा प्रवास थांबवला. आमची फ्लाइट चुकण्याची शक्यता होती. हे गोव्यासाठी आणि भारतासाठी अतिशय वाईट आहे, असे ती म्हणाली.

पर्यटकांच्या म्हणण्यानुसार, हॉटेल प्रशासनाकडूनही कोणतीही मदत मिळाली नाही. रिसॉर्टच्या बाहेर ही घटना घडली, मात्र कोणीही हस्तक्षेप केला नाही, असे संबंधित महिलेच्या मुलीने सांगितले.

या घटनेमुळे गोव्यातील पर्यटक व स्थानिक टॅक्सी चालकांमधील दीर्घकालीन संघर्ष पुन्हा समोर आला आहे. यापूर्वीही अनेक पर्यटकांनी स्थानिक चालकांकडून होणाऱ्या त्रासाची तक्रार केली असून, राज्यातील ऑनलाईन टॅक्सी सेवा आणि स्थानिक यंत्रणा यामध्ये समन्वयाचा अभाव स्पष्ट दिसून येतो. झुरी रिसॉर्टजवळ स्थानिक टॅक्सी स्टँडवर उभ्या असलेल्या चालकांनी खाजगी टॅक्सी चालकांना अडवले होते, असा आरोपही यावेळी झाला. आम्ही केवळ आमच्या ग्राहकांना घेण्यासाठी आलो होतो. पण अचानक अडवण्यात आले आणि गोंधळ सुरू झाला, असे एका खाजगी टॅक्सी चालकाने सांगितले. आम्ही कुठलाही वाद सुरू केला नाही, आम्ही केवळ स्वतःचे संरक्षण करत होतो. या घटनेवर सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून, अनेकांनी गोव्याच्या पर्यटन धोरणांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. स्थानिक प्रशासन आणि पर्यटन खात्याने या प्रकारांकडे गांभीर्याने पाहून उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

तीव्र उष्णतेमुळे नागरिकांची दमछाक

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. १९ : राज्यात सध्या उन्हाळ्याच्या झळा अधिक तीव्र होत असून, दिवसा तापमान झपाट्याने वाढत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. परिणामी, उष्णतेपासून दिलासा मिळावा यासाठी नागरिक शीतपेय, फळांचे रस, थंड पाणी व फळांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहू लागले आहेत.

रात्री उशिरापर्यंतही उकाडा कायम असल्याने अनेक नागरिक पंखे, कूलर व एअर कंडिशनरचा वापर करून घरात गारवा निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. सध्या फोंडा परिसरात ऊसाचा रस, नारळपाणी, टरबूज व अन्य थंड पदार्थ विक्री करणाऱ्या दुकांनांमध्ये ग्राहकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. उन्हाळ्याचा त्रास टाळण्यासाठी मान्सूनपूर्व सरींची प्रतीक्षा सुरू असून, या उष्म्यापासून थोडासा दिलासा मिळेल अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

दरम्यान, वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर कूलर, फॅन आणि एसी यांसारख्या गारव्यासाठीच्या उपकरणांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. स्थानिक बाजारपेठांमध्ये तसेच रस्त्याच्या कडेला ऊस रसाचे यंत्र, नारळ विक्रेते व फळ विक्रेते यांच्याभोवती ग्राहकांची गर्दी होत आहे. विशेषतः ऊस रसाचे दर सध्या २० रुपये प्रति ग्लास असून, कोवळ्या नारळासाठी ५० रुपये किंमत आकारली जात आहे.

फलाहारांमध्ये टरबूजसाठी सर्वाधिक मागणी असून, सध्या ते सुमारे ३० रुपये प्रतिकिलो दराने विकले जात आहे. याशिवाय, आंब्याच्या चाहत्यांसाठी गोव्यातील मानकुराड आंब्याला चांगली मागणी असून, त्याचे दर फळांच्या आकारानुसार १२०० ते १५०० रुपये प्रति डझन पर्यंत पोहोचले आहेत.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या उष्णतेच्या लाटेमुळे नागरिक त्रस्त झाले असून, दुपारच्या वेळी घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे. त्यामुळे शीतपेय आणि फळांचा पर्याय अधिकाधिक नागरिक निवडत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

मिशनरीज ऑफ चॅरिटीच्या मालमत्तेबाबत असिस्टेन्सिया गोवाचा खुलासा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १९ : येथील धर्मादाय संस्था असिस्टेन्सिया गोवा ने स्पष्ट केले आहे की, सांत इनेज येथील मिशनरीज ऑफ चॅरिटी च्या मालमत्तेचा उपयोग केवळ संस्थात्मक आणि समाजोपयोगी कार्यासाठीच केला जाणार असून, व्यावसायिक हेतूने ती वापरण्यात येणार नाही.

या संदर्भात असिस्टेन्सिया गोवाचे अध्यक्ष नेव्हिल मोंटेरो यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, २२ मार्च २०२५ रोजी मिशनरीज ऑफ चॅरिटीकडून आम्हाला अधिकृत पत्र प्राप्त झाले असून त्यांनी घर व परिसर आमच्या ताब्यात परत देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय आमच्यासाठी अनपेक्षित होता.

मोंटेरो यांनी सांगितले की, संस्थेच्या मालकीच्या जागेच्या दीर्घकालीन भाडेपट्ट्याबाबत चर्चा अंतिम टप्प्यात असताना हे पत्र मिळाले. आम्ही त्यांच्या सेवाभावी कार्याची दखल घेत एक संयुक्त प्रस्ताव तयार केला होता, ज्याअंतर्गत एक मजली नवीन इमारत उभारण्यात येणार होती. या प्रस्तावाला २०१४ मध्ये मान्यता मिळाली होती, आणि उत्तर गोवा नियोजन आणि विकास प्राधिकरण कडून देखील आवश्यक मंजुरी देण्यात आली होती. मात्र, हा प्रकल्प प्रत्यक्षात येऊ शकला नाही,असे ते म्हणाले. असिस्टेन्सियाच्या व्यवस्थापकीय समितीच्या म्हणण्यानुसार, ६० टक्के मालमत्ता मिशनरीज ऑफ चॅरिटीला वापरासाठी देण्यात आली होती, तर उर्वरित ४० टक्के मालमत्ता संस्थेकडे राखीव ठेवण्यात आली होती. गरजू आणि निराधार नागरिकांसाठी मिशनरीज ऑफ चॅरिटीच्या उपक्रमांना समर्थन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता.

आमचे ध्येय गरिबांपर्यंत पोहोचण्याचे असून मिशनरीज ऑफ चॅरिटी याच उद्दिष्टावर कार्यरत होती. त्यामुळे हा निर्णय आमच्यासाठी धक्कादायक आहे, कारण त्यांनी एकतर्फीपणे केंद्र बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, असे मोंटेरो यांनी स्पष्ट केले. या निर्णयाच्या वृत्तानंतर तीन स्वयंसेवी संस्थांनी असिस्टेन्सियाशी संपर्क साधून केंद्र चालवण्याची तयारी दर्शवली आहे.

दरम्यान, कॅरिटास गोवाचे संचालक फादर मॅव्हरिक फर्नांडिस यांनी असिस्टेन्सिया गोवावर मिशनरीज ऑफ चॅरिटीचा छळ केल्याचा आरोप केला होता. मात्र, या आरोपांचे मोंटेरो यांनी खंडन केले. फादर मॅव्हरिक यांना चुकीची माहिती देण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले. फादर फर्नांडिस यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, जर असिस्टेन्सिया गोवाचे दावे खरे असतील, तर त्यांनी मिशनरीज ऑफ चॅरिटीकडे जाऊन त्यांना पुन्हा केंद्र चालवण्याची विनंती करावी. पणजीला त्यांच्या सेवांची आवश्यकता आहे.

बीफच्या कमतरतेमुळे ईस्टर उत्सवाच्या तयारीत अडथळा

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १९ : शनिवारी सकाळी मडगाव मार्केट मध्ये गोंधळाच्या वातावरणामुळे ईस्टर उत्सवाच्या तयारीवर मोठा परिणाम झाला. स्थानिक मांस दुकाने, विशेषत: दक्षिण गोवा नियोजन आणि विकास प्राधिकरण (एसजीपीडीए) मार्केटमधील, शनिवार व रविवार बीफ खरेदी करण्यासाठी ग्राहकांची मोठी गर्दी दिसून आली, मात्र तेथे पुरवठा अत्यंत मर्यादित असल्याने अनेक ग्राहक निराश होऊन परत गेले.

ग्राहकांच्या लांब रांगा, आणि बीफच्या कमी पुरवठ्यामुळे दुकानांमध्ये तणावाचे वातावरण होते. एसजीपीडीए मार्केटमधील विक्रेते रहीम बेपारी यांनी सांगितले, आमच्याकडे सकाळी ६.३० वाजता ग्राहकांची रांग लागली होती, मात्र आमच्याकडे असलेला पुरवठा या मागणीची काहीच पूर्तता करु शकला नाही. आमच्या गोमांसाचा पुरवठा सकाळी ७.३० वाजता पोहोचला, परंतु दोन तासांतच दुकान बंद करावे लागले. ईस्टर जवळ येत असल्याने मागणी वाढली होती, पण आम्ही अर्ध्या ग्राहकांनाही सेवा देऊ शकलो नाही. या अचानक बीफ कमतरतेमुळे मडगावमधील विविध गोमांस दुकांनासमोर मोठ्या रांगा लागल्या होत्या आणि ग्राहकांची नाराजी वाढली. अनेकांनी या समस्येची वेळोवेळी पुनरावृत्ती झाल्याची तक्रार केली आहे. आता हे खूप वेळा घडत आहे, असे कॅमिलो डिसोझा यांनी सांगितले. आम्ही गर्दी टाळण्यासाठी लवकर पोहोचतो, परंतु तरीही आमच्याकडे आवश्यक वस्तू मिळवण्याची गॅरंटी नाही. विशेषतः सणाच्या वेळी ही परिस्थिती अत्यंत निराशाजनक आहे,

रोमल्डो डायस यांनी सांगितले की, गोमांसाचे सांस्कृतिक आणि भावनिक महत्त्व ईस्टर सणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. बऱ्याच गोमंतकांसाठी, टेबलावर गोमांसाशिवाय ईस्टर पूर्ण होत नाही. त्यामुळे, या कमतरतेमुळे उत्सवाचा अनुभव अपूर्ण होतो.

दक्षिण गोव्यात गोमांस पुरवठ्याची समस्या काही महिन्यांपासून सुरू आहे, आणि याबद्दल कारणे अस्पष्ट असली तरी, काहींनी याला नियामक निर्बंध, लॉजिस्टिक विलंब किंवा पुरवठादारांकडून कमी उपलब्धता हे कारण दिले आहे. ग्राहक, विक्रेते आणि अधिकाऱ्यांमध्ये चांगल्या समन्वयाने या समस्येवर उपाय शोधण्यासाठी सरकारचे हस्तक्षेप आवश्यक आहे, अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, विशेषतः सणांच्या काळात अधिक स्थिर आणि समर्पक पुरवठा सुनिश्चित केला जाऊ शकतो.

वार्का टॅक्सी ऑपरेटर्सचे आंदोलन; हॉटेल्सवर कारवाईची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १९ : ॲप आधारित व बाहेरील टॅक्सी सेवांच्या वाढत्या प्रभावाविरोधात वार्का येथील स्थानिक पर्यटक टॅक्सी ऑपरेटर्सनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, हॉटेल व्यवस्थापनांवर आरोप करत कारवाईचा इशारा दिला आहे.

वार्का परिसरातील झुरी व्हाईट सँडसह इतर प्रमुख हॉटेल्समध्ये बाहेरील टॅक्सी ऑपरेटर्सना प्रवेश देण्यात येत असून, त्यामुळे स्थानिक टॅक्सी चालकांचे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेषतः अलीकडेच सुरू झालेल्या एका अनामिक टॅक्सी ॲपच्या माध्यमातून बाहेरील चालकांची वाढती उपस्थिती ही स्थानिकांसाठी मोठी चिंता ठरत आहे.

वार्का गावचे माजी सरपंच जोस अफोन्सो यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, हॉटेलच्या पाहुण्यांना घेण्यासाठी बाहेरील चालकांना परवानगी दिली जात आहे, जेव्हा स्थानिक टॅक्सी उपलब्ध असूनही त्यांना डावलले जात आहे. पाहुण्यांनी स्थानिक टॅक्सी बुक केल्यावरही ती रद्द केली जाते आणि बाहेरच्या चालकांना प्राधान्य दिले जाते.

अफोन्सो यांनी सांगितले की, वार्का ग्रामस्थांनी रोजगाराच्या आशेने या हॉटेल्सना पाठिंबा दिला होता. स्थानिक बेरोजगारांना रोजगार मिळावा, या उद्देशानेच ही हॉटेल्स येथे स्थायिक झाली आहेत, असे ते म्हणाले.

टॅक्सी ऑपरेटर ब्रिटो फर्नांडिस यांनी देखील या परिस्थितीवर नाराजी व्यक्त करत म्हटले की, बाहेरील टॅक्सी चालकांमुळे आमच्याकडे काम राहत नाही. पाहुणे थेट ॲपवरून टॅक्सी बुक करतात आणि आमची उपजीविका संकटात येते.

स्थानिक टॅक्सी ऑपरेटर्सनी गंभीर आरोप करत सांगितले की, काही बाहेरील चालक वाहने चालवताना शस्त्रे बाळगतात. सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ही गंभीर बाब आहे. हॉटेल व्यवस्थापन आणि बाहेरील टॅक्सी चालक यांच्यात संगनमत असून, अधिकाऱ्यांनी त्वरित कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. टॅक्सी व्यवसायाशी संबंधित कार्यकर्ते वॉरेन आलेमाव यांनीही बाहेरील टॅक्सी चालकांवर तीव्र शब्दांत टीका केली. हेच खरे माफिया आहेत. स्थानिकांना डावलले जात असून प्रशासनाने तत्काळ हस्तक्षेप करावा, असे ते म्हणाले.

स्थानिक टॅक्सी ऑपरेटर्सनी हॉटेल्समध्ये स्थानिक चालकांसाठी समर्पित टॅक्सी स्टँड अनिवार्य करणाऱ्या करारांची अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. त्यांनी इशारा दिला की, जर प्रशासनाने त्वरीत उपाययोजना केली नाही, तर ते हॉटेलच्या प्रवेशद्वारांवर निदर्शने करणार आहेत आणि व्यवसाय ठप्प करण्यास भाग पाडतील. गोव्याच्या इतर पर्यटन भागांतील स्थानिक टॅक्सी चालकांकडूनही यापूर्वी अशा प्रकारच्या मागण्या व आंदोलनाची उदाहरणे समोर आली आहेत. ॲप–आधारित सेवांचा विरोध हा सध्या स्थानिक टॅक्सी व्यवसायातील एक व्यापक मुद्दा ठरत आहे.

एचपीव्ही लसीकरण मोहिमेला सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १९ : मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी शनिवारी पणजी कम्युनिटी सेंटर येथे गर्भाशयाच्या कर्करोगाविषयी जागरूकता आणि एचपीव्ही लसीकरण मोहिमेला प्रारंभ केला. या मोहिमेद्वारे १३ ते १९ वयोगटातील १०० वंचित मुलींना मोफत एचपीव्ही लस देण्यात आली. या उपक्रमाला रोटरी क्लब ऑफ पणजी आणि वन वर्ल्ड गोवा यांनी सहकार्य केले.

मुख्यमंत्री सावंत यांनी या उपक्रमाच्या उद्घाटनावेळी बोलताना म्हटले की, नवीन विकसित केलेली एचपीव्ही लस मुलींना गर्भाशयाच्या कर्करोगापासून संरक्षण देण्यास महत्त्वाची भूमिका बजावेल. ही लस १००% चाचणी केली आहे आणि भारत सरकारने यास अधिकृत मान्यता दिली आहे. लवकरच या लसीला राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमात समाविष्ट केले जाईल. त्यांनी यासोबतच या मोहिमेमुळे वंचित मुलींना जीवनरक्षक संरक्षण मिळवण्याची संधी मिळणार असल्याचे सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यां, पालकां आणि शिक्षकांना तंदुरुस्ती आणि आरोग्यावर अधिक लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. स्वच्छतेइतकेच तंदुरुस्ती महत्त्वाची आहे. स्वच्छ भारत मोहिमेप्रमाणेच फिट इंडिया मोहिमेतही सक्रिय लोकसहभाग आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८४ देशांमध्ये योगासने पोहोचवली आहेत. त्यामुळे आपल्याला निरोगी राष्ट्र निर्माण करण्यासाठी योगदान द्यावे लागेल, असे ते म्हणाले.

गोवा एड्स सोसायटीच्या प्रकल्प संचालक डॉ. वंदना धुमे यांनी कर्करोग प्रतिबंधक मोहिमेतील या उपक्रमाला महत्त्वाची पायरी ठरवले आणि सांगितले, उपचारांपेक्षा प्रतिबंध नेहमीच चांगला असतो. लसीकरण हे एक शक्तिशाली साधन आहे जे तरुण मुलींना त्यांच्या आरोग्याची आणि भविष्याची जबाबदारी घेण्यास सक्षम करते. यावेळी लसीचा दुसरा बूस्टर डोस २५ ऑक्टोबर रोजी हॉटेल मनोशांती येथे दिला जाईल, अशी माहिती देखील दिली गेली.